संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# या करोडपतींना निवृत्तिवेतनाची गरजच काय?

**आता** आपल्या देशातील लोकप्रतिनिधित्वाची व्याख्या खरोखरच बदलण्याची वेळ आलेली आहे. लोकप्रतिनिधी हे सरकारी नोकर नसतात. लोकशाही मार्गाने निवडून आलेले ते काही काळासाठीचे ते लोकप्रतिनिधी असतात. आमदार, खासदार म्हणून वावरताना त्यांना मिळणारी सर्व प्रकारची सरकारी सुविधा कायद्यानुसार योग्यही ठरते. परंतु, आमदार, खासदार म्हणून निवृत्त झाल्यावर किंवा त्यांची पुन्हा विधिमंडळावर किंवा संसदेवर निवड झाली नाही. तर त्यांना या मिळणाऱ्या सुविधा बंद केल्या पाहिजेत. परंतु, विधिमंडळ आणि संसद यांना असलेल्या अधिकारांचा हे लोकप्रतिनिधी इतक्या सरधोपटपणे वापर करीत आहेत की, मग त्यांच्या मानधनामध्ये घसघशीत वाढ करण्यापासून ते निवृत्तीनंतर तहहयात पेन्शन मिळवण्यापर्यंत ते आपल्या मनाप्रमाणे निर्णय घेत सुटले आहेत. एकीकडे २००९ पासून सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन बंद करण्याचा निर्णय घेतला गेला. कारण देशातील कोट्यवधी निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांचे पेन्शन सतत देत राहिले, तर सरकारवर कितीतरी मोठा आर्थिक बोजा पडतो. आज अशी परिस्थिती आहे की, नोकरीच्या कालावधीपेक्षाही निवृत्तीचा काळ जास्त होतो आणि त्याकरिता सरकारला पेन्शनचा भार सहन करावा लागतो. आज अनेक सरकारी कर्मचारी असे सांगत आहेत की, आम्ही नोकरीपेक्षाही पेन्शनमधून जास्त पैसे कमावीत आहोत, ही निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांची प्रतिक्रिया ऐकल्यानंतर सरकारी तिजोरीवर किती मोठा भार पडतो हे लक्षात येते. दिवसेंदिवस सरकारी कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनाचा जादा बोजा सहन करण्याची वेळ येऊ नये, म्हणून त्यांची पेन्शन बंद करण्यात आली. त्याच्याऐवजी भविष्यनिर्वाह निधीतील काही रक्कम बाजूला काढून त्यातून अतिशय अल्प प्रमाणातले म्हणजे केवळ अडीच ते चार हजारपर्यंतचे पेन्शन घेण्याचा पर्याय दिला गेला आहे. आपल्या देशातील सरकारी कामाचा व्याप, सरकारी कर्मचाऱ्यांची संख्यायाविषयी राजकारण्यांकडून नेहमीच टीका होत असते. कर्मचारी किंवा कामगारांना देण्यात येणाऱ्या सुविधा कमी करण्याकडे सत्ताधाऱ्यांचा कल असतो. अशा परिस्थितीत आमदार, खासदारांना तहहयात निवृत्तिवेतन देण्याची गरजच काय? सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात परखड भूमिका घेतल्यामुळे सगळ्याच खासदारांचे पित्त खवळलेले दिसते. न्यायालयाने यात तोंड खुपसू नये , अशीही भाषा वापरली गेली आहे.

### हा तर शुध्द मनमानीपणा

देशातील सामान्य माणसाच्या परिस्थितीत कोणताही विशेष फरक पडत नसताना त्या सामान्य जनतेचे नेतृत्व करणाऱ्या पुढाऱ्यांनी मात्र आपल्या पोळीवर तूप ओतून घेणे कितपत योग्य ठरते, याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. सरकारच्याच नियोजन आयोगाच्या म्हणण्याप्रमाणे ज्या देशातील गरिबाला रोज बत्तीस रुपयेसुध्दा मिळत नाही किंवा बत्तीस रुपये रोज मिळवणारा गरीब आहे, अशी त्याची व्याख्या केली जाते. या देशाचा राज्य कारभार करणारे लोकप्रतिनिधी महिन्याकाठी दोन लाखांचे वेतन घेत असतील आणि निवृत्तीधारक लोकप्रतिनिधी पेन्शन अधिक इतर लाभ मिळून महिन्याकाठी पन्नास हजारांचा सरकारी तिजोरीवर बोजा टाकत असतील तर ते अत्यंत अनुचितच ठरते. खरे तर या लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेऊन आम्हाला निवृत्तिवेतन नको, अशा प्रकारची भूमिका घ्यायला हवी किंवा अतिशय नाममात्र म्हणून महिन्याकाठी पाच ते दहा हजार रुपये त्यांनी स्वीकारले पाहिजे. ही रक्कम निवृत्तिवेतन म्हणून नव्हे तर मानधन म्हणून स्वीकारली पाहिजे.न्यायालयाने आमदार, खासदारांच्या या निवृत्तिवेतनाच्या वाढीवर आक्षेप घेतला आहे. कोणत्याही प्रकारचा अभ्यास न करता किंवा त्याचा तिजोरीवर पडणारा भार लक्षात न घेता लोकप्रतिनिधींच्या निवृत्तिवेतनात वाढ करण्याचा एकाअर्थी मनमानीपणा दाखवला आहे. याविषयी आपले मत नोंदवताना सर्वोच्च न्यायालयाने हे लोकप्रतिनिधी आज करोडोपती आहेत, त्यांना निवृत्तिवेतनाची गरज काय? असादेखील प्रश्न उपस्थित केला होता आणि ही खरोखरच वस्तुस्थिती आहे. कोणताही लोकप्रतिनिधी असो, त्याला जर संसद किंवा विधिमंडळावर निवडून जायचे असेल तर अक्षरशः कोट्यवधींचा खर्च करावा लागतो. आज सर्व लोकप्रतिनिधींच्या सांपत्तिक विवरणाचे सर्वेक्षण जर केले तर निवडून येण्यापूर्वीची आर्थिक स्थिती आणि निवडणुकीनंतरची वर्षभरातली आर्थिक परिस्थिती यात जमीन आसमानाचा फरक पाहायला मिळतो. असे कितीतरी लोकप्रतिनिधी सापडतील की, ज्यांच्या संपत्तीत वर्षाकाठी वीस ते पंचवीस कोटींची वाढ झाल्याचे पाहायला मिळेल. म्हणून हे खरेच आहे की, या करोडपतींना पेन्शनची गरजच काय?

### स्वातंत्र्यसैनिकांना कमी मानधन

यातला वैशिष्ट्यपूर्ण भाग असा असतो की, एक-दोन वेळा विधिमंडळ किंवा संसदेवर निवडून जायचे आणि पुढची चाळीस-पन्नास वर्षे घरी बसून पेन्शन घेत राहायचे हा सरळ सरळ करदात्यांच्या पैशाचा दुरुपयोग ठरतो. जर सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन योजना बंद झाली असेल तर लोकप्रतिनिधींचीसुध्दा पेन्शन योजना बंद झाली पाहिजे. थोडा विचार केल्यानंतर अशीही एक गोष्ट लक्षात येते की, आज देशाच्या संरक्षणाकरिता प्राणार्पण केलेल्या सैनिकांच्या विधवांनादेखील इतके घसघशीत निवृत्तिवेतन मिळत नाही. किंवा स्वातंत्र्यासाठी लढा दिलेल्या स्वातंत्र्य सैनिकांनासुध्दा अशा प्रकारची निवृत्तिवेतनातली वाढ दिली जात नाही. हा सगळा प्रकार जर लक्षात घेतला, तर आमदार-खासदारांनी वाढ मागणे किंवा अशी वाढ करण्याचा आमदार-खासदारांना पुरेपूर अधिकार आहे. अशी दर्पोक्ती दाखवणे हेदेखील चुकीचे ठरते. याकरता सरकारने थोडा गांभीर्याने विचार केला पाहिजे. लोकप्रतिनिधींनीसुध्दा यासंदर्भात सामाजिक संवेदनशिलता दाखवून एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच निवृत्तीनंतरचे मानधन स्वीकारण्याचा आदर्श घालून दिला पाहिजे. जर या देशातील चाळीस लाख दारिद्र्यरेषेखालील लोक बत्तीस रुपयेसुध्दा रोज मिळवू शकत नसतील, तर त्या देशाच्या लोकप्रतिनिधींना महिन्याकाठी बत्तीस हजार निवृत्तिवेतन घेण्याचा अधिकारही पोहचत नाही.